# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद - ४३१ ००४ (महाराष्ट्र) (भारत)

(नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त)

दूरध्वनी कार्यालय : (०२४०)२४०३११८/२४०३११९

कुलसचिव : (का)२४०३३३३

(नि)२४००२०३, २४०३३१०

फॅक्स : (०२४०) २४०३३३५

Website : www.bamu.net

e-mail : bcud.office@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद - ४३१ ००४
(महाराष्ट्र) (भारत)


संदर्भ क्रमांक :शैक्ष/संलग्न/२०१८-१९/11724 दिनांक : ०३-१२-२०१८.

प्रति,

**मा. प्राचार्य,**

**सागर बहुउद्देशिय शिक्षण संस्था संचलित,**

**[ EJ52409 ] सागर बी.सी.ए. महाविद्यालय,**

**जे. इ. एस. कॉलेज जवळ, जनता हायस्कुल, नविन जालना,जि.जालना**

**विषय :-** जून २०१८ पासून पदवी / पदव्युतर अभ्यासक्रमांचे संलग्नीकरण चालू ठेवणे बाबत.

**संदर्भ :-** विद्या परिषदेने घेतलेला निर्णय दि.३०-०६-२०१८ व दि. ०२-०७-२०१८.

**महोदय/महोदया,**

जून २०१८ पासून आपल्या महाविद्यालयाचे संलग्नीकरण चालु ठेवणे बाबत आपल्या अर्जाच्या / प्रस्तावाच्या अनुषंगाने महाविद्यालयास भेट देऊन अहवाल सादर करण्यासाठी संलग्नीकरण समिती नियुक्त करण्यात आली होती.

सदर संलग्नीकरण नुतणीकरण समितीने प्रस्तुत प्रकरणी आपल्या महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालावर विद्या परिषदेच्या दि. ३० जुन २०१८ व ०२ जुलै २०१८ रोजी झालेल्या बैठकीत विचार होऊन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम ११० (४) मधील तरतुदीनुसार परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेसह अटी व शर्तींच्या अधिन राहुन जून २०१८ पासून एका वर्षाकरीता पदवी / पदव्युतर अभासक्रमासाठी संलग्नीकरण चालू ठेवणे / नैसर्गिक वाढीस मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० (४) च्या तरतुदीनुसार विद्या परिषदेचा उपरोक्त निर्णय आपणास कळविण्यात येत असून निर्देशित करण्यात येते की, विद्या परिषदेने संलग्नीकरणाबाबत निर्धारित केलेल्या अटींची पूर्तता तीन महिन्यात करावी व अटींच्या पूर्ततेबाबतचे हमीपत्र विद्यापीठास दि. ३१-१२-२०१८ पर्यंत सादर करावे. तसेच या अटींच्या पुर्तेते बाबतचा अहवाल दि. ३१-०३-२०१९ पूर्वी विद्यापीठास सादर करावा.

विद्यापीठाने निर्धारित केलेल्या प्रपत्र " अ " प्रपत्र " ब " व प्रपत्र " क " नुसार संलग्नीकरण नुतनीकरण समितीच्या अहवालानुसार आपल्या महाविद्यालयात पदवी / पदव्युतर अभ्यासक्रमास खालील कोष्टकात दर्शविल्या प्रमाणे गुण प्राप्त झालेले आहेत.

| प्रपत्राचे नाव | प्रपत्राची माहिती | कमाल गुण | एकूण प्राप्त गुण | किमान आवश्यक गुणांची टक्केवारी | एकूण प्राप्त गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| **प्रपत्र अ** | अनिवार्य मुलभूत सुविधा | 150 | 104 | 60 % | 69.3% |
| **प्रपत्र ब** | इतर आवश्यक सुविधा | 200 | 135 | 50 % | 67.5% |
| **प्रपत्र क** | व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा | 50 | 32 | 50 % | 64% |

प्रस्तुत प्रकरणी आपणास असेही कळविण्यात येते की, यापूर्वी विद्यापीठाने दिलेल्या वेगवेगळ्या आदेशांची पुर्तता व अटींच्या अधिन राहून पदवी / पदव्युतर अभ्यासक्रमासाठी हे संलग्नीकरण देण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**PRINCIPAL**
Sagar College, Jalna

Scanned with OKEN Scanner

अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबत माहिती [परिशिष्ट " अ "]:

| अ.क्र. | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे नांव | वर्ष | वार्षिक संलग्नित विषयांची नांवे | वार्षिक संलग्नित अभ्यासक्रमा करीता निर्धारीत केलेली तुकडी निहाय प्रवेश क्षमता | प्रस्तुत महाविद्यालयास कायम संलग्नित असलेल्या अभ्यासक्रमाची नांवे | कायम संलग्नित असलेल्या अभ्यासक्रमा करीता निर्धारीत केलेली तुकडी निहाय प्रवेश क्षमता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 1 | बॅचलर ऑफ कंप्युटर अप्लिकेशनस् (बी.सी.ए.) | प्रथम वर्ष | सर्व अनिवार्य विषय | 1 तुकडी (60 विद्यार्थी) | -- | -- | |
| 2 | बॅचलर ऑफ कंप्युटर अप्लिकेशनस् (बी.सी.ए.) | द्वितीय वर्ष | सर्व अनिवार्य विषय | 1 तुकडी (60 विद्यार्थी) | -- | -- | |
| 3 | बॅचलर ऑफ कंप्युटर अप्लिकेशनस् (बी.सी.ए.) | तृतीय वर्ष | सर्व अनिवार्य विषय | 1 तुकडी (60 विद्यार्थी) | -- | -- | |

अटी :

1) Performa Compeleted
2) Performa Compeleted
3) one full time teacher will be appointed
4) increse number of computers
5) Avalibility of Jounnrals Realeated to Faculty
6) Purchase Refernce Books upto 5000/-

आपला विश्वासू

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

प्रतिलिपी : [ परिशिष्ट " अ "]

१. मा. संचालक, ( उच्च शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, शिवाजी नगर, पुणे यांना माहितीस्तव अग्रेषित.
२. मा. मह संचालक, ( उच्च शिक्षण ), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.
३. मा. संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. यांना माहितीस्तव अग्रेषित.
४. उपकुलसचिव ( आरक्षण कक्ष ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. यांना माहितीस्तव अग्रेषित.
५. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान मंडळ मर्या, ( MKCL ) आय सी. सी. ट्रेड टॉवर, ५ वा मजला, ए विंग सेनापती बापट मार्ग, पुणे यांना माहितीस्तव अग्रेषित.
६. अधीक्षक, अव्यवसायिक विभाग, ( शैक्षणिक विभाग ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. यांना माहितीस्तव अग्रेषित.
७. सहाय्यक अधीक्षक, पात्रता युनिट ( शैक्षणिक विभाग ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. यांना माहितीस्तव अग्रेषित.
८. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. यांना माहितीस्तव अग्रेषित.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

PRINCIPAL
Sagar College, Jalna

Scanned with OKEN Scanner